RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# चिपळूणकरपूर्व निबंधातील मूल्यविचार

**डॉ.शिवलिंग मेनकुदळे**
मराठी विभाग
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (महाराष्ट्र)

**शोधनिबंधाचा सारांश**

*19 वे शतक हे मराठी माणसाच्या वैचारिकतेची जडण–घडण करणारे शतक होते. पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांनी हिंदुस्थानावर राजकीय सत्ता स्थापन केली. सुरवातीच्या काळात इंग्रजांनी सुधारणावादी दृष्टिकोण ठेवून काही समाज सुधारणा घडवून आणल्या. शिक्षण व्यवस्था निर्माण करणे त्याचाच एक भाग होता. मात्र त्यातूनच एक विचारवंतांची, लेखकांची पिढी निर्माण झाली आणि वाङ्मयनिर्मितीला चालना मिळाली. प्रारंभीची वाङ्मयनिर्मिती प्रबोधनात्मक स्वरुपाची होती. तथापि त्यातूनच सामाजिक मूल्यविचार, वाङ्मयीन मूल्ये, भाविक अभिव्यक्तीचे वेगळेपण प्रत्ययास येते. आजच्या व्यापक स्वरुपाच्या वाङ्मयनिर्मितीचा पाया याच कालखंडात घातला असे म्हटले तर वावगे ठरत नाही. या निबंध वाङ्मयातून प्रबोधनात्मक मूल्यविचार मध्यवर्ती ठेवून लेखन झाले असले तरी श्रेष्ठ दर्जाची वाङ्मय, भाषिक, सामाजिक मूल्ये त्यातून प्रतिबिंबीत झालेली पहावयास मिळतात. याशिवाय स्वतंत्र मराठी वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकांची संख्या अधिकाधिक स्वरुपात निर्माण झालेली पहावयास मिळते. थोडक्यात एकोणिसावे शतक हे समाज प्रबोधनाचे आणि वाङ्मय निर्मितीला चालना देणारे होते असे म्हटल्यास ते वावगे ठरत नाही.*

**प्रास्ताविक**

एकोणिसावे शतक म्हणजे महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शतक होते. या शतकात महाराष्ट्राच्या संस्कृतीत आणि पर्यायाने मराठी वाङ्मयात फार मोठ्या प्रमाणात बदल घडून आला. प्राचीन काळापासून चालत आलेली पद्यरचनेची परंपरा जणू नष्ट झाली होती आणि नवे प्रवाह वेगवेगळे स्वरुप येऊ लागले. ही एक मराठी वाङ्मय क्षेत्राला मिळालेली फार मोठी देणगीच म्हणावी लागेल. नवी शासनव्यवस्था, शिक्षणसंस्था, ग्रंथप्रसार, वृत्तपत्रे, ख्रिस्ती धर्माचा प्रसार, यासारख्या सामुदायिक किंवा व्यक्तिगत हालीचालींचा भारतीय जीवनावर व वाङ्मयावर परिणाम होणे अगदी स्वाभाविकच होते. त्यामुळे जीवनाच्या राजकीय धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अंगाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन येथील लोकांना प्राप्त झाला. किंबहुना राजकीय क्रांतिबरोबरच एक प्रचंड मासिक क्रांती येथे घडून आली. या सर्वांचा वाङ्मय निर्मितीवर परिणाम होणे अपरिहार्य होते 1. किंबहुना एका सुधारणावादी दृष्टिकानातून असे म्हणता येईल की निबंध ही मराठी वाङ्मयाला मिळालेली फार मोठी देणगीच आहे. जीवनाच्या नव्या जाणिवा समाजाच्या तळापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्य या कालखंडातील निबंधवाङ्मयने केले. पुढे इ.स.1874 मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपली निबंधमाला सुरू केली आणि निबंध वाङ्मयाच्या एका नव्या पर्वाला सुरूवात झाली.

निबंध वाङ्मयप्रकार हा इंग्रजी वाङ्मयाच्या मदतीने मराठीमध्ये अवतरला. अव्वल इंग्रजी कालखंडातील प्रथम शिकून सुशिक्षित झालेली पिढी इंग्रजांचे प्रचंड ज्ञान पाहून थक्क झाली. व आपल्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

स्वकीयाचे अज्ञान पाहून हळूहळू लागली. आपल्या ज्ञानाचा फायदा करून समाजाला द्यावा असे त्यांना वाटू लागले. आधुनिक मराठी वाङ्मयाचा पाया याच काळात रचला गेला.

### निबंधाची रचना आणि समाजप्रबोधन मूल्य

पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटिश राजवट भारतात आली. ब्रिटिशांच्या अनेक सुधारित गोष्टीबरोबरच इंग्रजी वाङ्मयही भाषांतरीत करून मराठीमध्ये आणले गेले. या इंग्रजी साहित्याच्या मदतीनेच मराठीत निबंध हा वाङ्मय प्रकार अस्तित्वात आला. सुचेल त्या विषयावर स्फूट स्वरूपात रचना करावी, मुख्य विषयाला अनुसरून विषयाची मांडणी करणे, एखाद्या महत्वाच्या मुद्यावर जोर देणे, त्याची पुनरावृत्ती करणे, असे प्रारंभीच्या निबंधाचे स्वरूप होते. यामध्ये श्रेष्ठ स्वरूपाची वाङ्मयीनता, व रचनेतील सुबध्दपणा नव्हती. परंतु पुढील निबंध वाङ्मयाचा आणि एकूणच मराठी साहित्याचा पाया होता. यामुळे या निबंध वाङ्मयाला एक वेगळे मूल्य प्राप्त झाले आहे. प्रामुख्याने लोकहितवादी, बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, का.बा.मराठे, भाऊ महाजन, बाळशास्त्री जांभेकर, मिसेस फरार, यासारख्या श्रेष्ठ निबंधकारांनी समाजप्रबोधनासाठी निबंधाचे लेखन केले होते.

1874 मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला वाचकांच्या समोर ठेवली. आणि मराठी निबंधमालेचे एक दुसरे पर्व सुरू झाले. या कालखंडात सुरवातीच्या निबंधातील बालबोधपणा निघून गेला व एका वैचारिक वाङ्मयाचा उगम झाला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लेखनातून भाषा, लेखन शुध्दी, इंग्रजी भाषा, विव्दत्व आणि कवित्व, डॉ.जॉन्सन यासारखे वैचारिक निबंध येऊ लागले. या निबंधांची रचना मुद्देसूद होती, विषयाची मांडणी, विस्तार, अलंकारिक व सुभाषितपूर्व वाक्याची रचना यासारखे विशेष त्यांच्या रचनेत येऊ लागले. याच कालखंडात अनेक निबंधकार आपले निबंध लिहून प्रसिध्द करू लागले होते. चिपळूणकरांच्यासारखेच निबंधलेखन करणारे निबंधकार म्हणून आगरकरांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या निबंधात रचनेतील बांधेसुदपणा, अलौकिक तत्वनिष्ठा, उच्च विचारसरणी याची प्रचीती येते. टिळकही याच कालखंडातील निबंधकार होते. परंतु त्यांच्या लेखनात चिपळूणकरांच्यासारखी शैली नव्हती. त्याचे विषयही साधे होते. समाज, धर्म, चरित्र, काव्य, इतिहास, मृत्युलेख अशा अनेक विषयावर त्यांनी लेखन केले. रचनेला, भाषेला सजविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला नाही. चिंतामण वैद्यांचे लेख पांडित्यपूर्ण असले तरी भाषाशैलीचा विकास त्यामध्ये मुळीच नव्हता.

1874 नंतरच्या कालखंडात अनेक निबंधकार आपले निबंध लिहू लागले होते. मात्र या सर्वांच्या पाऊलखुणा एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीच्या कालखंडातून निर्माण झाल्या आहेत. त्या निबंधातून एक विशिष्ट बांधसूदपणा आला. हे सर्व घडत असताना पूर्व परंपरेचा धागा निश्चितपणे त्यांच्याजवळ होता. ही सुरवातीची अवस्थाच निबंध या वाङ्मयप्रकाराच्या विकासाला कारणीभूत ठरली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी पूर्व निबंधातील अपूर्णता, त्यांच्यातील ओबडधोबडपणा समजावून घेतला. व एका नव्या जोमाने व वैचारिकतेने निबंधलेखन केले. त्यांच्या लेखनाची छाप त्या काळातील अनेक निबंधकारांवर पडलेली दिसून येते.

### वाङ्मयीन मूल्य

अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी वाङ्मय निर्मितीचा पाया घातला जाऊ लागला होता. इंग्रजी वाङ्मयाच्या मदतीने मराठी साहित्याच्या क्षेत्रात निबंध हा वाङ्मयप्रकार आकार धारण करू लागला. सुरवातीला समाजातीलच एखादा सामाजिक, राजकीय धार्मिक विषय घेऊन त्यावर स्फूट स्वरूपाचे लेखन करण्यास सुरवात झाली. आपणास समजलेला एखादा विषय किंवा प्रश्न समाजाला पटवून सांगणे या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

हेतूने लेखन होऊ लागले. यावेळी आपल्या लेखनातून विशिष्ट तर्कशुध्द पध्दती वापरण्याएवढी जाण या विचारवंतामध्ये आलेली नव्हती. मात्र त्यांच्या वाङ्मयीन शैलीचा पुढच्या काळातील निबंधकारांना निश्चितच उपयोग झालेला दिसून येतो.

एखाद्या विषयाचे सूत्रबध्द विवेचन करणे हे निबंध वाङ्मयाचे मुख्य वैशिष्ट्ये मानले जाते. लोकहितवादीच्या लेखनात असा एखादा विषय काटेकोरपणे बांधलेला दिसून येतो. ''वाङ्मयनिर्मितीमागे प्रौढ गंभीर हेतू असावयास हवा तो हेतू समोर ठेवून लोकहिवादींनी अर्वाचीन काळात प्रथम लेखन केले. म्हणून लोकहितवादीना अर्वाचीन मराठी गद्य व निबंधाचे जनक मानले जाते.''2 वक्तृत्व संपन्न भाषाशैली, लालित्यपूर्ण निबंध, ओघवती निवेदन शैली इ. वाङ्मयीन गुण लोकहितवादींच्या लेखनातूनच पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, टिळक व इतर अनेक निबंधकारांनी घेतले आहेत.

बाबा पद्मनजी यांची भाषाशैलीही आकर्षक होती. भाषेतील प्रौढी, पदरचनेची शैली, विचारांचे गांभीर्य, शब्दालंकाराची जाणीव, सूचकता, रंजनपरता, साधेपणा, यासारखे काही वाङ्मयीन विशेष आपल्या लेखनातून त्यांनी स्पष्ट केले आहेत. त्याचा उपयोग तात्कालिन लेखकांना व पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, फडके यासारख्या निबंधकारांना झाला. फडके यांनी आपल्या लेखनातून एक खास अशी लेखनशैली निर्माण केली आहे.

का.बा.मराठे यांनी तर पूर्वी कोठेही चर्चा न झालेल्या वाङ्मयीन विषयावर चर्चा करुन समीक्षा व टीका लेखनाचा पायाच घातला. 'नावल आणि नाटक' याविषयी निबंध लेखन करुन समीक्षात्मकता, किंवा एखाद्या विषयावर टीका, परिक्षण करून त्यातील गुण दोषाची मांडणी करणे ही नवी वाङ्मयीन दृष्टी समकालिकांना व पुढच्या पिढीला आणून दिली. या लेखनाबद्दल ते म्हणतात–''प्रस्तुत नावले लिहिणारे व नाटके लिहिणारे फार झाले आहेत, हव्या तशा कल्पना पुस्तकातून घालतात व हवा तितका सत्याचा अपलाप करतात. असे होऊ नये म्हणून कोणीतरी चांगल्या विद्वानाने नावल व नाटक ह्याच्या स्वरूपाविषयी निबंध लिहावा तो छापून प्रसिध्द करावा. रा.बा.विष्णुपंतानी हा अभिप्राय दोन तीन चांगल्या विव्दानांस कळवला परंतु कोणाच्याही हातून ही गोष्ट झाली नाही, म्हणून पुढील अल्पविद्वानांचा निबंध छापण्यात आला. त्यात न्यूनता पुष्कळ असतील, परंतु काही माहिती इंग्रजी निबंधातून व संस्कृत ग्रंथातून घेतली आहे. ती ह्यापुढे नावल करणाऱ्यास उपयोगी पडेल अशी निबंधकर्त्याची आशा आह.''3 या निबंधावर संस्कृत वाङ्मयाची व इंगजी वाङ्मयाची छाप होती. त्यामळे संस्कृत व इंग्रजी पध्दतीचा वापरही त्यांनी आपल्या निबंधातून केला आहे.

सामाजिक बांधिलकीची जाणीव या काळातील सर्वच निबंधकारांच्या निबंधात होती. विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी याच विचाराचा पुरस्कार केला आहे. निवेदनातील साधेपणा, विचाराची व्यापकता व सर्व समावेशक दृष्टी यासारखे वाङ्मयीन गुण विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी आपल्या निबंधातून मराठी वाचकांना व वाङ्मयाला दिले. तडफदारपणा, वक्तृत्व गुण, युक्तीवाद चातुर्य व आग्रहीपणा इत्यादी गुण त्यांनी मराठी साहित्याला बहाल केले.

## सामाजिक मूल्य विचार

ब्रिटिशपूर्व काळात महाराष्ट्राची समाजव्यवस्था ही भारतीय समाज व्यवस्थेचे एक महत्वाचे अंग होते. आपली समाजरचना ही ईश्वरप्रणीत असून ती अपरिवर्तनीय आहे असा समज सामाजिक जीवनात ठाण मांडून बसला होता. या समाजजीवनात कोणताही बदल होणे शक्य नाही. अशी समजूत रूढ

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

झाली होती. सर्व सामाजिक व धार्मिक संस्था ईश्वरप्रणीतच होत्या. अशा प्रकारचा समज समाज व्यवस्थेत रुढ होता. त्यामुळे सर्व सामाजिक जीवनात एक निर्जीवपणा निर्माण झाला होता. त्यामुळे परिवर्तनाचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. ज्ञानावर आधारलेल्या निष्ठेतून समाजात बदल घडून येतो. पण आमच्याकडे ज्ञान आणि निष्ठा या दोन्हीचाही अभाव होता. स्वतःच्या सामर्थ्याने काही कार्य करता येते, असा विश्वासच माणसात फारसा उरला नव्हता. या स्थितीचे वर्णन करताना लोकहितवादी म्हणतात ''आमची ग्रहपध्दती, आमची राज्यपध्दती, आमची शस्त्रे, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीती, सारांश – इंग्रजी होईपर्यंत आमचे सारे व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व घशात घालून ओतलेल्या पोलादासारखे किंवा निर्बाड शृंखलाबध्द बंदिवानासारखे अथवा हाडकासारखे शेकडो वर्ष होऊन राहिले असे म्हणण्यास हरकत नाही.''4 आमची समाजरचनाच अशा तऱ्हेने गतीशून्य झाली होती.

1818 साली पेशवाईचा अस्त झाला. राजकीय सत्तेची सर्व सूत्रे इंग्रजाच्या हाती गेली आणि प्रथमच भारतीय समाजरचनेत व समाजजीवनात परिवर्तनाची लाट आली. इंग्रज राज्यकर्त्यांनी सुरवातीच्या काळात सुधारणावादी दृष्टिकोन स्वीकारला होता. वाङ्मयाच्या क्षेत्रातही हे परिवर्तन होऊ लागले होते. मात्र इंग्रजांच्या या सुधारणावादामध्ये स्वार्थी हेतू आहे. हे आमच्या सुशिक्षित झालेल्या विचारवंताना प्रथमच जाणवले तेव्हा पासून आपल्या भारतीय जनमाणसाची अस्मिता जागी करावी असे त्यांना वाटू लागले. या प्रेरणेतून मराठीमध्ये स्फूट लेखनाला सुरवात झाली. हे स्फूट लेखन अर्थात इंग्रजी भाषेच्या मदतीनेच केले जात होते. हे स्फूट लेख म्हणजेच निबंध होय. निबंध हा वाङ्मयप्रकार म्हणजे मराठी साहित्याला इंग्रजी वाङ्मयाने दिलेली फार मोठी देणगीच आहे. किंबहुना इहवादी दृष्टिकोनातून विचार केला तर मराठी माणसांच्या मनाची व वैचारिकतेची मशागतच या वाङ्मयाने केली होती.

समाजातील निद्रिस्त असलेल्या माणसाला जागे करणे हेच प्रयोजन असल्यामुळे सामाजिक सुधारणा हाच तत्कालीन वृत्तपत्र, नियतकालिकांचा व निबंध या वाङ्मयाचा हेतू होता. ख्रिस्ती मिशनरी लोकांनी हिन्दू धर्मावर ओरखाडे ओडले होते. याकडे आमच्या विचारवंतांनी दुर्लक्ष केले नाही. उलट अंतर्मुख होऊन त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी नवशिक्षितांचा दृष्टिकोन महत्वाचा होता. विष्णुशास्त्री पंडितांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायावर, जुलमावर आपल्या लेखनातून प्रखर हल्ला चढविला तेव्हा हिन्दुधर्माचा नव्याने विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे सर्वात महत्वाचे कार्य निबंध या वाङ्मय प्रकाराने केले. लोकहितवादींचे सर्व लेखन सामाजिक जाणिवेतूनच निर्माण झाले आहे. सामाजिक सुधारणा हा त्यांच्या लेखनाचा केंद्र बिंदू आहे. समाजातील दृष्ट प्रवृत्तीवर लोकहितवादींनी हल्ला चढविला. बाबा पद्मनजी यांनीही सामाजिक सुधारणेचाच पुरस्कार आपल्या लेखनातून केला. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार आपल्या लेखनातून केला. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार 'स्त्रीविद्याभास' या निबंधातून केला. तर मद्यपान, निषेधक बोध, कुटुंब सुधारणा, व्यभिचारी निषेधक बोध,यासारख्या निबंधातून समाजातील वैगुण्यावर बोट ठेवून सामाजिक सुधारणेचा विचार मांडला. एकूणच इ.स.1818 ते 1874 या कालखंडातील निबंधातून समाज सुधारणेचा पुरस्कार केला आहे.

**भाषिक मूल्य**

मराठी वाङ्मयाला एक हजार वर्षाची प्रदीर्घ परंपरा असलेली दिसून येते. ब्रिटिशपूर्व काळात पद्य स्वरूपात वाङ्मय निर्मिती केली जात होती. मात्र अव्वल इंग्रजी कालखंडात गद्य वाङ्मय रचनेला चालना मिळाली. शिक्षणाला गती मिळाली. मुद्रणकला आली, ब्रिटिशाकडून नवे विचार झपाट्याने येऊ

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

लागले. आपल्या विचारांच्या प्रकटीकरणासाठी गद्य लेखनच योग्य वाटू लागले. इ.स.1832 च्या सुरवातीला बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' हे वृत्तपत्र निघाले व त्यातून विचार प्रकट होऊ लागले. राजकीय व सामाजिक जीवनावर लिहिणाऱ्या लेखकांच्या संख्या वाढू लागली. निबंध व वृत्तपत्रे यांचा अविभाज्य संबंध जोडला गेला. अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी निबंध वाङ्मयाची पायाभरणी झाली. यामध्ये काही प्राथमिक स्वरुपाची भाषिक वैशिष्ट्ये पूर्वसूरीपेक्षा अभिव्यक्तीचे स्वरूप वेगळे होते. एखाद्या विषयाचे सुत्रबध्द व व्यवस्थित विवेचन करणे हे निबंधाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये लोकहितवादी, बाबा पद्मनजी यांच्या सारख्या विचारवंतात होते. मराठी गद्य शैलीचा विकासही याच कालखंडात झाला. या निबंधाची भाषा साधी सरळ व सर्व सामान्य माणसाला समजणारी होती यामध्ये एकप्रकारचा रांगडेपणा व व्यवहारिकता असलेली जाणवते. परंतु साहित्य निर्मितीच्या प्रारंभीची अवस्था म्हणून याला एक वेगळे महत्व प्राप्त झाले आहे.

## नवनवीन वाङ्मय निर्मिती

एकोणिसावे शतक हे मराठी वाङ्मय निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे शतक होते. इंग्रजांनी आपली राजकीय सत्ता स्थापन करण्यासाठी शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. प्रारंभीच्या काळात भाषांतरीत स्वरूपाचे साहित्य मराठीमध्ये आणले गेले. या भाषांतरीत वाङ्मयाबरोबरच नवनवीन प्रकारचे साहित्य मराठीमध्ये निर्माण झाले. यामध्ये प्रामुख्याने नाटक, कादंबरी, कथा यांचा समावेश होता. 1843 मध्ये विष्णुदास भावे यांनी 'सीता स्वयंवर' हे पौराणिक कथेवर नाटक लिहून मराठी साहित्याच्या क्षेत्रात नाट्यवाङ्मयाचा पाया घातला. तसेच 1857 मध्ये बाबा पद्मनजी यांनी 'यमुनापर्यटन' ही सामाजिक विषयावर स्वतंत्र कादंबरी लिहिली. तसेच इंग्रजीतील सॉनेट या काव्यप्रकारावरुन केशवसुतांनी 'सुनित' हा एका नवीन काव्यप्रकार मराठी वाङ्मययात निर्माण केला. या सर्व वाङ्मयप्रकारांचे मूळ खऱ्या अर्थाने मराठी निबंधातच आहे असे म्हणावे लागते.

## नवीन लेखकांना चालना

निबंध वाङ्मयाची निर्मिती इंग्रजी वाङ्मयाच्या मदतीने निर्माण झाली असली तरी आमच्या विचारवंताना सामाजिक, राजकीय, धार्मिक विषयावर विचार मांडण्याची तळमळ यातूनच निर्माण झाली. यामुळे अनेक लेखक, निबंधकार उदयाला आले. अनेक लेखकांनी आपल्या विचारांची मांडणी केली. कादंबरी, नाटक, काव्य, निबंध या सर्व साहित्यप्रकारांची निर्मिती होऊ लागली. बाळशास्त्री जांभेकर, बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, भाऊ महाजन, लोकहितवादी यासारख्या अनेक लेखकांची निर्मिती या सुरवातीच्या निबंध वाङ्मयामुळेच झाली.

1818 साली पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजांनी राजकीय क्षेत्राची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली होती. सुरूवातीच्या काळात त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन होता. या सुधारणावादामागे त्यांचा राज्यस्थापनेचा स्वार्थी हेतू आहे हे आमच्या विचारवंताना जाणवले. त्यामुळे राजकीय दृष्टिकोनातून लेखन करण्यासाठी सुरवातीला बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' हे वृत्तपत्र निघाले. त्यातून विचार प्रकट होऊ लागले. राजकीय व सामाजिक जीवनावर लिहिणाऱ्या लेखकांची संख्या वाढू लागली. यातूनच अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी निबंध वाङ्मयाची पायाभरणी झाली. यामध्ये काही प्राथमिक स्वरूपातील भाषिक वैशिष्ट्ये होती. एखाद्या विषयाचे सुबध्द, व्यवस्थित विवेचन करणे हे निबंधाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य लोकहितवादी, बाबा पद्मनजी, यांच्यासारख्या विचारवंताच्या लेखनीत होते. मराठी गद्य शैलीचा विकासही याच कालखंडात झाला. या निबंधाची भाषा बालबोध वळणाची होती. त्यामध्ये

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

एक रांगडेपणा जाणवितो. परंतु साहित्यनिर्मितीची सुरवातीची अवस्था म्हणून याला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे.

## निष्कर्ष

इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्काने, अध्ययनाने मराठीतील विविध वाङ्मयप्रकारांना स्वतःचा असा एक आकृतीबंध प्राप्त झाला यामध्ये निबंध हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार होता. एकूणच महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर आणि साहित्यावर इंग्रजी वाङ्मयाचे, त्यांच्या राजकीय धोरणाचे खोलवर संस्कार झाले होते. आपल्या पूर्व वाङ्मयाचे स्वरुप पाहिले तर इंग्रजी वाङ्मयाच्या परिणामाची जाणीव होते. मराठी साहित्याचे आजचे स्वरुप व त्याचा विकास या सर्वांच्या पाऊलखुणा इंग्रजी साहित्यापासुनच मिळाल्याचे दिसून येते. त्या इंग्रजी साहित्याने मराठी साहित्याला एका अर्थाने खतपाणी घातले व बहराला आणले. अनेक वाङ्मयीन मूल्ये त्यामध्ये आलेली दिसून येतात. अनेक प्रकारच्या वाङ्मयीन, सामाजिक व भाषिक शैलीचे गुण आम्ही इंग्रजी वाङ्मयातूनच उचलले आहेत. आजच्या वाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीने या पाऊलखुणा अत्यंत महत्वाच्या आहेत.

## संदर्भ सूची

1. जोग रा.श्री : मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चौथा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पृष्ठ क्र.11
2. फडकुले निर्मलकुमार : लोकहितवादी कला आणि कर्तृत्व, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – 1973, पृ.क्र. 259
3. जोग रा.श्री : मराठी वाङ्मयाचा इतिहास, उनि पृष्ठ क्र.532
4. फडकुले निर्मलकुमार : लोकहितवादी कला आणि कर्तृत्व उनि पृष्ठ क्र 27